**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३९/२०१९**
**निशाणी क्र. ३०**
**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३**

**नाव - तुकाराम बंडू जाधव**

**वय - ८८**

**धंदा - शेती**

**राहणार - कोरेगाव ता. कोरेगाव जि. सातारा**

**अभियोगपक्षातर्फे शपथेवर सरतपास विधीज्ञ श्री. व्ही. एस. कोकाटे यांच्यामार्फत सुरु**

कोरेगाव मध्ये १८२४, १८२५, १८२७, १८२८,१८३० अशा ५ मिळकती माझ्या नावी आहेत. सदर मिळकतींचे सातबारा उतारे माझ्या नावे आहेत. माझे राहते घर मिळकत क्र. १८२४ मध्ये उत्तरबाजूस आहे. १८३० मध्ये मोकळी जागा आहे. घराच्या पश्चिमेला झारे यांचे घर आहे. झारे यांनी सन २०१८ मध्ये आमच्या जागेत अतिक्रमण केले होते. झारे यांनी आम्हांला न विचारता परवानगी शिवाय बांधकाम चालू केले होते. त्याबाबत मी नगरपंचायती मध्ये तक्रारी अर्ज दाखल केला. आता मला सदर तक्रारी अर्जाची झेरॉक्स प्रत दाखविण्यात आली. त्यातील मजकूर बरोबर आहे त्यावरील सही माझी आहे. सदर प्रत छायांकित असल्याने त्यास आर्टिकल अ देण्यात येत आहे. नगर पंचायतीने त्यांचे विरुध्द कार्यवाही केली व पोलीस स्टेशनने आरोपींविरुध्द केस दाखल केली. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.जी. मुलाणी यांच्यामार्फत सुरु.**

माझे इयत्ता दुसरी पर्यंत शिक्षण झाले आहे. माझे पुर्वीचे आडनाव सापते होते. ते गॅझेटने जाधव केले. कृष्णा बंडू सापते हे माझे थोरले मोठे भाऊ आहेत. आम्ही एकूण ५ भाऊ आहे. आम्ही मुळचे कोरेगावचे असून लोणंद येथे भाडेपट्ट्याने राहत होतो. कोरेगाव मध्ये सन १९८२ मध्ये आलो. माझे इतर बंधू लोणंद मध्ये आज तागायत राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या

मिळकतीच्या पश्चिमेस आरोपींची सिटी सर्व्हे नं. १८२६ व १८२९ ही झारे यांच्या खरे मालकीचे आहे. सदर मिळकत सन १९६७ मध्ये आरोपींच्या पूर्व हक्कदारांनी खरेदी केल्याचे मला माहिती नाही. वर नमूद मिळकती माझ्या वडिलांनी बंडू बापू सापते यांनी खरेदी केल्या होत्या. आरोपींना ज्यानी क्षेत्र विकले त्या विजया बाबूराव क्षीरसागर होत्या. विजया यांनी रामू सावळा रेवळकर यांचेकडून मिळकत विकत घेतली होती. माझे वडील व रामू रेवळकर यांच्यात रे.दि.मु.नं. २०१/१९४४ हा दावा झाल्याचे मी लहान असल्यामुळे मला माहिती नाही. हे मला माहिती नाही की, सदर दाव्यामध्ये तडजोड होवून निम्मे निम्मे क्षेत्र घेण्याचे वादी प्रतिवादी यांच्यामध्ये ठरले होते. कृष्णा बंडू सापते हे माझे थोरले बंधू एकत्र कुटुंब मॅनेजर होते. माझ्या थोरले बंधूनी आरोपींच्या विरुध्द अतिक्रमण काढण्याकरिता ६३/१९७० हा दावा केला होता याबाबत मला सांगता येणार नाही. सदर दावा पुन्हा दाखल करण्याकरिता काढून घेतल्याचे मला माहिती नाही. मी आरोपींविरुध्द अतिक्रमण काढून घेण्याचा दावा कधीही केला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, अतिक्रमण नव्हते त्यामुळे मी दावा दाखल केला नाही. मी नगरपंचायतीमध्ये अर्ज देण्यापूर्वी माझी मिळकत सी.स. नं. १८३० ची मोजणी करुन घेतली होती. मी दाखल केलेल्या अर्जासोबत मोजणी नकाशा जोडला नव्हता. किती व कधी अतिक्रमण केले याची तारिख मी अर्जामध्ये नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या पश्चिमेला लागून झारे यांच्या शेड व घर मिळकती आहेत. आरोपी झारे यांचे कुटुंब मिळकतीच्या खरेदीपासून आमच्या पश्चिमेस राहत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन १९७० सालाची आरोपींच्या विरुध्द माझी अतिक्रमणाची तक्रार आहे. आरोपींनी परवानगी घेतल्याची खातरजमा मी ग्रामपंचायतीत केली नव्हती. आरोपींच्या बाजूला माझ्या घराच्या पश्चिम भिंतीला खिडकी किंवा दरवाजा नाही. माझी व आरोपींची मिळकत सातारा-पंढरपूर रस्त्यालगत असून रस्ता उत्तर बाजूला येतो. माझ्या घराची लांबी रुंदी मला सांगता येणार नाही. अतिक्रमणाबाबतचा कोणताही पुरावा मी पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमच्या कोणत्याही मिळकतीत अतिक्रमण केले नसल्याने तसा पुरावा माझ्याकडे नाही व तसा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सी.स. नं. १८३० आरोपींनी अतिक्रमण करुन बांधकाम केले हा मजकूर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला व माझ्या कुटुंबाला आरोपींविरुध्द केलेल्या कोठल्याही दाव्यात यश मिळकत नाही त्यामुळे मी सदरचा खोटा अर्ज नगरपंचायती मार्फत केला आहे व नगरपंचायतीला खोटी केस करण्याबाबत

भाग पाडले. हे म्हणणे खरे नाही की, पश्चिमबाजूच्या भिंतीच्या पलीकडे माझी कोणतीही वहिवाट नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या विरुध्द चिडून असल्याने मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती**

**कोरेगांव** **(सी. एस. पाटील)**

**दिनांक - २५/११/२०२५** **प्रथम** वर्ग **न्यायादंडाधिकारी, कोरेगांव.**